ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

दि. 9/08/25

## नोटीस

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की दि. 12/8/2025 रोजी ' भारतीय ग्रंथापाल- दिना' निमित्त ग्रंथालया मध्ये डॉ. एस आर. रंगनाथान यांचे प्रतिमा पूजन आणि 'बेस्ट रिडर अवार्ड' प्रदान कार्यक्रमासाठी सकाळी 10.30 वाजता ग्रंथालयात उपस्थित रहावे.

ग्रंथपाल

प्राचार्य

ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर
दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज,
इचलकरंजी

## कार्यक्रम पत्रिका

दिनांक -१२ ऑगस्ट २०२५

सकाळी 10:30 वाजता

**भारतीय ग्रंथापाल- दिना निमित्त**

डॉ. एस आर. रंगनाथान यांचे प्रतिमा पूजन

हस्ते- प्राचार्य डॉ. एस.के.खाडे

प्रमुख उपस्थित- डॉ. डी.ए.यादव(दुपारसत्र प्रमुख)

प्रा.व्ही.पी.पाटील (सकाळसत्र प्रमुख)

प्रस्तावना-प्रा.व्ही पी.पाटील

सूत्र संचालक – रोहित शिंगे

आभार – संजीवनी कदम

**महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.डॉ.एस.के,खाडे डॉ.एस.आर.जयंतीनिमित्त ग्रंथपाल दिनाचे उद्घाटनप्रसंगी**



**प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी**



**Best Reader award 2025-26 Teacher**
**Prof Mungare D.J. (Mathematics Deptartment)**



**Best Reader award 2025-26** (Non –Teaching )

**Mr. Karke Jaykumar**



**Best Reader award 2025-26 Student**
**Miss Sanika S. Bhamne ( B.Com III)**




# कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिनानिमित्त उपस्थित ग्रंथालय स्टाफ आणि विद्यार्थी



# डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा बातमी

- ICHMH51 NEWS ABHIJIT PATWA
- August 16, 2025
- 12:11 pm
- 
  - **ग्रंथपाल दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य अनिल पाटील.शेजारी प्राचार्य डॉ.एस.के.खाडे व इतर**

## डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

*इचलकरंजी :* दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजमध्ये एस.आर. रंगनाथन जयंतीनिमित्त ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांमधील *'बेस्ट रीडर'* पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. ***'बेस्ट रीडर'*** पुरस्कार विजेत्यांमध्ये कु. सानिका भामणे (विद्यार्थी), प्रा. डी. जे. मुंगारे (प्राध्यापक) आणि श्री. जयकुमार करके (शिक्षकेतर कर्मचारी) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



प्रमुख पाहुणे डॉ. पाटील यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "वाचनाने माणूस समृद्ध होतो. आधुनिक तंत्रज्ञान आणि एआयच्या युगात आळशीपणा वाढू शकतो, त्यामुळे पुस्तकांशी नाते जोडणे गरजेचे आहे." अध्यक्षीय भाषणात डॉ. खाडे म्हणाले की, "अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन करून सर्वांगीण विकास साधावा. वाचन हाच विकासाचा राजमार्ग आहे."

कार्यक्रमात प्रा. डी. ए. यादव आणि प्रा. व्ही. पी. पाटील यांचीही उपस्थिती होती. स्वागत ग्रंथपाल सौ. स्वाती देसाई यांनी केले, प्रास्ताविक प्रा. रोहित शिंगे यांनी तर आभार कु. संजीवनी कदम हिने मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

---

**कार्यक्रम अहवाल –**

ग्रंथालयामध्ये वर्ष २०२५-२६ करिता ग्रंथालयीन उपक्रमा अंतर्गत पहिलाच उपक्रम हा ग्रंथालय दिनाच्या औचित्याने 2024-25 वर्षाच्या विद्यार्थी, प्राध्यापक आणि नॉन टीचिंग स्टाफ मधून जास्तीत जास्त पुस्तके वाचणार्या वाचकांना बेस्ट रीडर अवार्ड देण्यात आले. ग्रंथपाल दिन निमित्त भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्या प्रतिमेंचे तसेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शी. म. डॉ. बापुजी साळुंखे यांचे प्रतिमे चे पूजन आणि दीप प्रज्वलन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.अनिल पाटील सर , प्राचार्य शि. म.डॉ.बापुजी साळुंखे महाविद्यालय मिरज. आणि आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. खाडे सर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास डॉ. दि.ए. यादव सर आणि प्रा. व्ही. पी. पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग आणि प्राध्यापकांचे उपस्थिती होती.प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यर्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी तसेच वाचन विकासाचा संकल्प करावा. वाचनाने माणसाचे जीवन समृद्ध होते.वाचनाने माणूस घडतो असे सांगितले. या कार्यक्रमाअंतर्गत ग्रंथालया तर्फे बेस्ट रीडर अवार्ड 2024 -25 खालील प्रमाणे प्रदान करण्यात आले. १)विद्यार्थी-कु. सानिका एस. भामाने 2) प्राध्यापक – प्रा. मूनगारे डी.जे. 3) नॉन टीचिंग स्टाफ – श्री. करके जयकुमार या कार्यक्रमात पाहुण्यांचे स्वागत ग्रंथपाल सौ स्वाती देसाई यांनी केले तर प्रास्ताविक आणि सूत्र संचालन प्रा. रोहित शिंगे सर यांनी केले. विद्यर्थ्यान मधून कु. संजीवनी मराठे हिने मनोगत व्यक्त की व आभार प्रदर्शन केले.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur
DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE,
ICHALKARANJI - 416115
Affiliated to Shivaji University, Kolhapur | Accredited By NAAC 'A' Grade

दी.१३/१०/२०२५

# नोटीस

सिनिअर विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थांना कळविण्यात येते कि ,दी.१५/१०/२०२५ रोजी ग्रंथालयात ग्रंथालय, एन.सी.सी.,एन.एस.एस.आणि ,मराठी विभाग तसेच प्रबोधन वाचनालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येणार आहे तरी सर्व प्राध्यापक ,विद्यार्थी यांनी ग्रंथालयात दी.१५ /१० /२०२५ रोजी सकाळी ठीक 10 .30 वाजता हजर राहवे .

ग्रंथपाल
(सौ.प्रतिभा पाचंगे )
LIBRARIAN
Dattajirao Kadam Arts, Science & Commerce College
ICHALKARANJI, Dist. Kolhapur

प्राचार्य
प्रो.( डॉ.)एस.के.खाडे
Principal,
D.K.A.S.C. College
Ichalkaranji.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur
DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE,
ICHALKARANJI - 416 115
Affiliated to Shivaji University, Kolhapur | Accredited By NAAC 'A' Grade

ग्रंथालय विभाग ,मराठी विभाग आणि प्रबोधन वाचनालय, इचलकरंजी
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त
ग्रंथप्रदर्शन व व्याख्यान

बुधवार दि .१५/१०/२०२५

## कार्यक्रम पत्रिका

प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन : हस्ते मा.प्राचार्य प्रो.( डॉ.)एस.के.खाडे

मान्यवराचे स्वागत प्रास्ताविक : प्रा.प्रतिभा पाचंगे

ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन : उपस्थित मान्यवराच्या हस्ते

प्रमुख पाहुण्याचे मार्गदर्शन : मा.श्री.प्रसाद कुलकर्णी (कार्यवाह, समाजवादी प्रबोधनी )

अध्यक्षीय मनोगत : मा.प्राचार्य प्रो.(डॉ.)एस.के.खाडे

विद्यार्थी मनोगत : १.कु.कोमल कांबळे
२.कु.प्रिती भिसे

आभार : प्रो.(डॉ.)सुभाष जाधव

सूत्रसंचालन : कु.संजीवनी कदम

स्थळ : महाविद्यालयीन ग्रंथालय

वेळ
सकाळी १०.३० वाजता

संयोजक
कु.प्रतिभा पाचंगे

LIBRARIAN
Dattajirao Kadam Arts, Science & Commerce College
ICHALKARANJI, Dist. Kolhapur

वाचन प्रेरणा दिन

दिनांक : 15 ऑक्टोंबर 2025

स्थळ : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज.इचलकरंजी

आयोजक: ग्रंथालय विभाग मराठी विभाग समाज प्रबोधन इचलकरंजी

वाचन : संविधान- उद्येशिका, मुलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन

## अहवाल

### वाचाल तर वाचाल - प्राचार्य प्रो. (डॉ .)एस . के . खाडे

दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये डॉ . एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन संपन्न झाला . हा कार्यक्रम महाविदयालयातील ग्रंथालय विभाग , मराठी विभाग आणि प्रबोधन वाचनालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला . याप्रसंगी प्राचार्य प्रो. (डॉ. ) एस के खाडे साहेब यांनी वाचाल तर वाचाल असे मत मांडले . पुढे ते म्हणाले की, ग्रंथालयात सर्व प्रकारची पुस्तके असतात. कथा , कादंबरी ,नाटक ,चरित्र , आत्मचरित्र ,आत्मकथन असे वेगवेगळया प्रकारचे वाङ्मय हे वाचनासाठी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे . डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना भारत देश महासत्ता होणार यावर विश्वास होता कारण त्यांचा तरुणांवर विश्वास होता . प्रत्येकाने रोज किमान एक तास वाचन केले पाहिजे . अवांतर वाचनाने ज्ञानात वाढ होते . याबरोबरच दैनिक पेपर मधील संपादकीय लेख वाचन केल्याने आपले विचार समृद्ध होतात . कांही वाचकांना वाचल्याशिवाय झोप येत नाही कारण वाचन करणं हे सुद्धा एक चांगले व्यसन आहे . यातून माणसाचं व्यक्तिमत्व विकास होत जातो असे मत व्यक्त केले.कार्यक्रमासाठी एन .सी .सी विभाग आणि एन .एस .एस विभाग यांचेही मोलाचे सहकार्य लाभले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रतिभा पाचंगे यांनी केले . याप्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केलीत त्यामध्ये १) कु.प्रिती भिसे २)कु.कोमल कांबळे यांनी चांगले विचार मांडले .तसेच संविधान वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रो.डॉ . सुभाष जाधव यांनी मानले सूत्रसंचालन कुमारी संजीवनी कदम हिने केले . या प्रसंगी महाविद्यालयातील डी. ए यादव ,डॉ. सुभाष इंगळे ,डॉ.रुपाली सांभारे आदी प्राध्यापक वृंद ,ग्रंथालय स्टाफ , प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .


LIBRARIAN
Dattajirao Kadam Arts, Science & Commerce College
ICHALKARANJI, Dist. Kolhapur.

Principal,
D.K.A.S.C. College
Ichalkaranji.

17/10/2025

dailyhunt बातमी





# वाचाल तर वाचाल - प्राचार्य प्रो. (डॉ .)एस . के . खाडे

3hr 5 shares

इचलकरंजी दि. १५,दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये डॉ . एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन संपन्न झाला . हा कार्यक्रम महाविदयालयातील ग्रंथालय विभाग , मराठी विभाग आणि समाजवादी प्रबोधिनीचे प्रबोधन वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.याप्रसंगी प्राचार्य प्रो. (डॉ ) एस के खाडे यांनी वाचाल तर वाचाल असे म्हणत ग्रंथालयात सर्व प्रकारची पुस्तके असतात . कथा , कादंबरी ,नाटक ,चरित्र , आत्मचरित्र ,आत्मकथन असे वेगवेगळ्या प्रकारचे वांग्मय वाचनासाठी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे . डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना भारत देश महासत्ता [illegible]

17/10/25

17/10/25

(71) WhatsApp

3 pm

16/10/2025
महानकार्य

# वाचाल तर वाचाल: प्राचार्य डॉ.खाडे

इचलकरंजी दि. १५ : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये डॉ . एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन संपन्न झाला . हा कार्यक्रम महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग , मराठी विभाग आणि समाजवादी प्रबोधिनीचे प्रबोधन वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.याप्रसंगी प्राचार्य प्रो. (डॉ ) एस के खाडे यांनी वाचाल तर वाचाल असे म्हणत ग्रंथालयात सर्व प्रकारची पुस्तके असतात . कथा , कादंबरी ,नाटक ,चरित्र , आत्मचरित्र ,आत्मकथन असे वेगवेगळया प्रकारचे वांग्मय वाचनासाठी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे . डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना भारत देश महासत्ता होणार यावर विश्वास होता कारण त्यांचा तरुणांच्यावर विश्वास होता . प्रत्येकाने रोज किमान एक तास वाचन केले पाहिजे . अवांतर वाचनाने ज्ञानात वाढ होते . याबरोबरच दैनिक वृत्तपत्रातील मधील संपादकीय लेख वाचन केल्याने आपले विचार समृद्ध होतात . कांही वाचकांना वाचल्याशिवाय झोप येत नाही कारण वाचन करणं हे सुद्धा एक चांगले व्यसन आहे . यातून माणसाचं व्यक्तिमत्व विकास होत जातो असे मत व्यक्त केले कार्यक्रमासाठी एन .सी .सी विभाग आणि एन .एस .एस विभाग यांचेही मोलाचे सहकार्य लाभले .

17/10/25

17/10/25

“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार” – शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, ICHALKARANJI - 416 115**

Affiliated to Shivaji University, Kolhapur I Accredited By NAAC 'A' Grade

# वाचन प्रेरणा दिन

## उपक्रम –संविधान : उद्येशिका मुलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन

### बुधवार दि.१५/१०/२०२५ ठिकाण – महाविद्यालय ग्रंथालय

### ग्रंथालय विभाग






# वाचन प्रेरणा दिन


## उपक्रम –संविधान : उद्येशिका मुलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन

### उपस्थित विद्यार्थी






ICHMH51 NEWS DATE: 16/10/2025



# वाचाल तर वाचाल – प्राचार्य प्रो. (डॉ .)एस . के . खाडे

इचलकरंजी:
दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये डॉ . एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन संपन्न झाला . हा कार्यक्रम महाविदयालयातील ग्रंथालय विभाग , मराठी विभाग आणि समाजवादी प्रबोधिनीचे प्रबोधन वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.याप्रसंगी प्राचार्य प्रो. (डॉ ) एस के खाडे यांनी वाचाल तर वाचाल असे म्हणत ग्रंथालयात सर्व प्रकारची पुस्तके असतात . कथा , कादंबरी ,नाटक ,चरित्र , आत्मचरित्र ,आत्मकथन असे वेगवेगळया प्रकारचे वांग्मय वाचनासाठी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे . डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना भारत देश महासत्ता होणार यावर विश्वास होता कारण त्यांचा तरुणांच्यावर विश्वास होता . प्रत्येकाने रोज किमान एक तास वाचन केले पाहिजे . अवांतर वाचनाने ज्ञानात वाढ होते . याबरोबरच दैनिक वृत्तपत्रातील मधील संपादकीय लेख वाचन केल्याने आपले विचार समृद्ध होतात . कांही वाचकांना वाचल्याशिवाय झोप येत नाही कारण वाचन करणं हे सुद्धा एक चांगले व्यसन आहे . यातून माणसाचं व्यक्तिमत्व विकास होत जातो असे मत व्यक्त केले
कार्यक्रमासाठी एन .सी .सी विभाग आणि एन .एस .एस विभाग यांचेही मोलाचे सहकार्य लाभले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभा पाचंगे यांनी केले . याप्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांनी स्वतःची मनोगत व्यक्त केली तसेच संविधान वाचन करण्यात आले या कार्यक्रमाचे आभार प्रो. डॉ . सुभाष जाधव यांनी मानले सूत्रसंचालन कुमारी संजीवनी कदम हिने केले . या प्रसंगी महाविद्यालयातील डी. ए यादव डॉ. सुभाष इंगळे आदी प्राध्यापक वृंद, समाजवादी प्रबोधिचे कार्यकर्ते,प्रबोधन वाचनालयाचे वाचक, प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

फोटो-वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात प्रा.एस के खाडे व शिक्षक

13/10/25

13/10/25

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur

**DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, ICHALKARANJI-416115**

Affiliated to Shivaji University, Kolhapur | Accredited by NAAC 'A' Grade



बुधवार दि .१२/०१/२०२६

# ग्रंथदिंडी

## कार्यक्रम पत्रिका

ग्रंथ दिंडी उद्घाटन : मा.श्री.प्रसाद कुलकर्णी (कार्यवाह, समाजवादी प्रबोधनी )

### ग्रंथ दिंडी पालखी मिरवणूक मार्ग

दि.१२ जानेवारी २०२६ - सकाळी १०.०० ते ११.०० ग्रंथदिंडी –पालखी मिरवणूक DKASC कॉलेज पासून शाहू पुतळया पर्यंत आणि कॉलेज पर्यंत

ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन : हस्ते मा.प्राचार्य प्रो.( डॉ.)एस.के.खाडे
(DKASC. कॉलेज, इचलकरंजी)

दि.१२ जानेवारी २०२६ – सकाळी ११.०० ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन स्थळ : महाविद्यालय ग्रंथालय

वेळ
सकाळी १०.०० वाजता

संयोजक
ग्रंथालय विभाग

मंयुरीसाठी सादर

06/01/2026

"ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

दि.०९/01/२०२६

## ग्रंथालय सूचना

महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातील प्राध्यापकांना कळविण्यात येते की, या वर्षी विवेकानंद सप्ताहाच्या निमित्याने 12 जानेवारी 2026 रोजी सकाळी 09.30 वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे तरी , सर्व विभागांनी ग्रंथदिंडी मध्ये सहभागी व्हावे व विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घ्यावे. ग्रंथ दिंडीचे उद्घाटन महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.एस के खाडे साहेब यांचे हस्ते होणार आहे. त्यानंतर ग्रंथदिंडी निघणार आहे. तरी सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे हि विनंती .

( डॉ. खाडे एस. के.)
प्राचार्य
दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँण्ड कॉमर्स कॉले..
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

"ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

5/01/2026

## ग्रंथालय सूचना

महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातील प्राध्यापकांना कळविण्यात येते की या वर्षी विवेकानंद सप्ताहाच्या निमित्ताने 12 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता ग्रंथ दिंडी व स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले असून, सर्व विभागांनी ग्रंथदिंडी मध्ये सहभागी व्हावे व विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घ्यावे. ग्रंथ दिंडीचे उद्घाटन श्री सुनिल कुलकर्णी सर (रामकृष्ण मिशन, कोल्हापूर विभाग) यांचे हस्ते होणार आहे.त्यानंतर ग्रंथालयामधील स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे मा,प्राचार्य डॉ.एस.के.खाडे सर यांचे हस्ते होईल तरी सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे.

LIBRARIAN
Dattajirao Kadam Arts, Science & Commerce College
ICHALKARANJI, Dist. Kolhapur

आ. विश्वासू
Principal,
D.K.A.S.C. College
Ichalkaranji.
(प्राचार्य)

## श्री.स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहांतर्गत आयोजित ग्रंथ दिंडी उपक्रम – 2026



ग्रंथ दिंडी उपक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री सुनील कुलकर्णी(रामकृ   ष्ण मिशन,कोल्हापूर)
यांच्या हातून ग्रंथ दिंडी चा प्रारंभ करण्यात आला.



ग्रंथ दिंडी उपक्रमामध्ये प्राचार्य डॉ.एस.के. खाडे, डॉ डी.ए.यादव,
रजिस्ट्रार श्री.जोग सर यांचा उत्स्फूर्त सहभाग.



ग्रंथ दिंडी उपक्रमामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा पारंपारिक वेशभुषे मध्ये उत्साहाने सहभाग.

# अहवाल

डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने ***ग्रंथदिंडी*** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व ग्रंथपूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रेरणादायी पुस्तके, फलक व घोषवाक्यांसह कॉलेज परिसरातून ग्रंथदिंडी काढली. "वाचन संस्कृती जपा", "पुस्तक हेच खरे मित्र" अशा घोषणांमुळे संपूर्ण परिसर वाचनमय वातावरणाने भारावून गेला.

ग्रंथप्रेम, वाचनसंस्कृती आणि ज्ञानप्रसाराचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी दिनांक १२ जानेवारी रोजी महाविद्यालयात ,दत्ताजीराव कदम आर्ट्स ,सायन्स आणि कॉमर्स कॉलेज ,शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे हायस्कूल यांच्या सयुक्त विद्यमाने भव्य **ग्रंथदिंडी**चे आयोजन करण्यात आले. ग्रंथदिंडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.खाडे सर यांचे मार्गदर्शन मिळाले. या ग्रंथदिंडीमध्ये शालेय विद्यार्थ्यांथी आणि वाद्यवृंद पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते.तसेच प्राध्यापक ,प्रशासकीय सेवक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.ग्रंथदिंडीसाठी प्रमुख पाहुणे संस्थेचे आजीव सभासद श्री.आर.जे.भोजकर सर ,महाविद्यालयाचे प्राचर्य डॉ.एस.के.खाडे साहेब यांच्या हस्ते व मान्यवराच्या उपस्थित संपन्न झाला.ग्रंथदिंडी हायस्कूल प्रांगण ते कन्या कॉलेज शाहू पुतळा मार्गे महाविद्यालयाच्या प्रांगणात ग्रंथदिंडीचा समारोप झाला.त्यानंतर समाजशास्त्र विभागाकडून पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन झाले वाचनकट्टा उद्घाटन त्यांतर रामकृष्ण मिशन कोल्हापूरचे डॉ.सुनील कुलकर्णी सर यांची श्री.स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि विचार मांडले.कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी,प्राध्यपक ,प्रशासकीय सेवक सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रोहित शिगे सर यांनी केले .आभार ग्रंथपाल सौ.प्रतिभा पाचंगे यांनी मानले.

## ग्रंथालय वभिागाला दोन संगणक संच भेट.



महावद्यिालयाचे हतिचतिक श्री दत्तात्रय मंगे यांच्याकडून ग्रंथालय या ज्ञान मंदरिाला दोन संगणक संच भेट देण्यात आले.
या प्रसंगी उपस्थति ए.आर. पी.कॉलेजच्या प्र.प्राचार्या डॉ श्रुती जोशी मॅडम ,डी.के.ए.एससी.
कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के.खाडे,रजि.आर.बी.जोग आणि प्राध्यापक वृ ंद.